

विजेत्या विद्यार्थ्यांसोबत कुलगुरू डॉ. उमा वैद्य

# राष्ट्रीय महोत्सवात संस्कृत विद्यापीठाची चमकदार कामगिरी

तभा वृत्तसेवा
नागपूर, ९ फेब्रुवारी

तिरुपतीस्थित राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठात नुकताच अखिल भारतीय विद्यार्थी प्रतिभा समारंभ २०१७ संपन्न झाला. यावेळी झालेल्या विविध स्पर्धांमध्ये कविकुलगुरू संस्कृत विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. स्पर्धेत संस्कृत लोकनृत्याच्या चमूला सुवर्णपदक प्राप्त झाले. संस्कृत गीतगायनात प्राची भट या विद्यार्थिनीला उत्तेजनार्थ पुरस्कार मिळाला. तर एकपात्री अभिनय सादर करणाऱ्या गौरी सोनटक्के हिने कांस्यपदक प्राप्त केले. शिवाय विश्वविद्यालयातर्फे प्रस्तुत 'गुरुदक्षिणा' या डॉ. विभा क्षीरसागर लिखित संस्कृत नाटकाची संस्कृतप्रेमी रसिक- श्रोत्यांनी आणि विद्वानांनी विशेष प्रशंसा केली. या टॅलेन्ट फेस्टिवलमध्ये भारतातील

एकूण २२ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. कविकुलगुरू संस्कृत विद्यापीठाच्या १२ विद्यार्थ्यांची चमू स्पर्धेत सहभागी झाली. त्यांनी संस्कृत वक्तृत्व, गीतगायन, लोकनृत्य, नाटक, एकपात्री अभिनय, रसप्रश्न इत्यादी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक स्पर्धांमध्ये भाग घेतला. यात श्रीवरदा म्हाळगे, गौरी सोनटक्के, दिव्यानी अनमोलवार, वैष्णवी दाभेकर, वृषाली दाणी, वेदश्री आर्वीकर, माधुरी वैद्य, प्राची भट, अमित मुळे, सत्यजित खताळ, अनुज शर्मा, परीक्षित झोडेकर या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कुलगुरू डॉ. उमा वैद्य आणि कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, सांस्कृतिक समितीच्या समन्वयिका डॉ. नंदा पुरी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. डॉ. कविता होले आणि प्रा. पराग जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि डॉ. जयवंत चौधरी व डॉ. रेणुका बोकारे यांच्या नेतृत्वाखाली ही चमू या उत्सवात सहभागी झाली होती. ■

Fri, 10 February 2017
www.readwhere.com/c/16746346